# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१८/०८/२०१९
## दि.१७/०८/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे २४९/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | कमलाकर बोरकर,वय-७५ वर्षे,रा.बिबवेवाडी रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०८/२०१९ रोजी सकाळी ०९/०० वा.ते दि.१७/०८/२०१९ रोजी १४/३० वा.चे दरम्यान बी/५,सरगम अपार्टमेंट,बिबवेवाडी रोड,कॅनरा बॅके समोर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख १५,०००/- रुपये रक्कम घरफोडी चोरी करुन नेला आहे. तसेच त्यांचे शेजारी राहणारे सौ.डिम्पल नेहुल व्होरा यांचे देखील घराचा कडी-कोयंडा कशाचे तरी सहाय्याने कापुन,त्यांचे घरात चोरी केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डी.बी.काळे ९५९४६७८३८३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ३१७/१९,भादविक २७९,३३७,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | एन.कातुर्डे, पो.शि. वारजे पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात वाहनावरील अज्ञात वाहनचालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०८/२०१९ रोजी रात्रौ २२/५५ वा. मुंबई-बैंगलोर हायवे रोडवरील चांदणी चौकाकडुन वारजेकडे जाणारे रोडवर वडंर फ्युचोरा बिल्डिंग फेज-१ समोरील हायवे रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात वाहनचालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी पुरी ललित बलराम,वय-२१,रा.मुळगांव-नेपाळ,सध्या रा.राजगुरुनगर-खेड,पुणे २.निमबाहादुर मोजी साऊद,वय-१९, वर्षे,रा.राजगुरुनगर,खेड,पुणे असे दोघेजण मुंबई-बैंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४ हिचेवरुन मुंबई-चांदणी चौकाकडुन वारजे ब्रिजकडे जाणा-या रस्त्यावरुन पायी जात असताना, दोघांना जबर ठोस मारून,पुरी बलराम याचे हाता-पायास जखमी करून,निमबहादुर मोजी साऊद याचे डोक्यास, तोडांस व दोन्ही हाता-पायास गंभीर जखमी करून,निमबहादुर याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.एस.गंधारे ८८८८३३९३३९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५५८/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १३२(१)(क) |
| **फिर्यादी** | रसिक कटारीया,वय-५६,रा.धायरी,पुणे |
| **आरोपी** | कारचालक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०८/२०१९ रोजी २१/०० ते २१/१५ वा.चे दरम्यान नारायणराव सणस विदयालय गेट समोर धायरी-फाटा,पुणे येथील सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाऊ जयकुमार झुंबरलाल कटारीया,वय-६५,रा.पांचाळ चाळ,नांदेड फाटा,पुणे हे एक पायाने दिव्यांग असल्याने ते खाली बसुन रोडचे पलीकडे स्वच्छतागृहातुन जावुन परत रोड ओलांडत असताना,कोणीतरी अज्ञात कारवरील वाहन चालकाने,त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी जयकुमार झुंबरलाल कटारीया यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्यांचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. खेडेकर ९८२२१३६६०८ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५५९/१९,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-१७ वर्षे,रा.निंबाळकरवाडी,कात्रज,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०८/२०१९ रोजी १६/३० वा.गुजर निंबाळकरवाडी रोडवरील रिवारीच बिस्लेरी कंपनीचे समोरील सार्वजनिक रोडवर गुजर निंबाळकरवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचेजवळ येवुन फिर्यादी यांना ''तु कोठे राहतो रे, तुझे नाव काय आहे, असे सांगुन, तुझ्या काळ्या रंगाच्या सॅक मध्ये गांजा आहे वगैरे असे बोलण्याचा बाहणा करुन,फिर्यादी यांचे पाठीवरील काळी सॅक दाखविण्यास सांगुन,त्यांना बोलण्यात मग्न करुन,फिर्यादी यांचे नकळत त्यांचे सॅक मध्ये असलेले ५०,०००/- रुपये रोख रक्कम हातचलाखीने काढुन फसवणुक करून,कात्रजच्या दिशेने निघुन गेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.आर.चिवडशेट्टी ८१०८२२२०६८ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ७२०/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२५ वर्षे,रा.औंध,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक व्यक्ती |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०५/२०१९ रोजी दु.१२/४५ ते १३/१० वा.चे दरम्यान गुगल-पे वरुन फिर्यादी यांचे राहते घरातुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचा घरातील जुने फर्निचर विकण्यासाठी ओ.एल.एक्स. या ऑनलाइन ॲपवर जाहिरात टाकली होती. त्यानंतर फिर्यादी यांना त्यांचे मोबाईलवर नमुद अज्ञात मोबाईलधारक व्यक्तीने त्यास सोफा विकत घ्यायच्या बहाण्याने फोन करुन,फिर्यादी यांना गुगल-पे ॲप ओपन करायला लावुन,त्याने पाठविलेली लिंक स्विकारण्यास सांगुन,त्या लिंकव्दारे फिर्यादी यांचे खात्यामधुन १० ऑनलाइन ट्रान्झेक्शने एकुण ९८,०००/-रुपये रक्कम फिर्यादी यांचे संमती शिवाय काढुन घेऊन,त्यांची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) गलांडे ९०११०३७७६२ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ५८२/१९,भादविक ३५३,४२७,५०६ |
| **फिर्यादी** | सोमाजी कोकाटे,सहा.पो.फौज. येरवडा मध्यवर्ती कारगृह,येरवडा,पुणे |
| **आरोपी** | न्यायबंदी इसम - संदीप संसारसिंग धुने |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०८/२०१९ रोजी ११/०० वा. येरवडा मध्यवर्ती कारगृह मुलाखत कक्ष,येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे येरवडा मध्यवर्ती कारगृह मुलाखत कक्ष येथे त्यांचे कायदेशीर कर्तव्य बजावित असताना,नमुद इसम न्यायबंदी संदीप धुने यास येरवडा मध्यवर्ती कारगृह मुलाखत कक्ष चालु असताना,त्यास फिर्यादी यांनी मुलाखतीचा वेळ संपलेबाबत समज देवुन,जाण्यास सांगितले असता,त्याने त्यास नकार दिला. त्यावेळी फिर्यादी यांनी इंटरकॉम संचाचा मेन एमसीईबी स्विच बंद केला असता,संदीप धुने यांनी एमसीईबी स्विच पुन्हा सुरू करुन,फिर्यादी यांना ''मैं मेंटल हुं,सब कुछ तोडफोड डालुंगा और तुमको भी मारुंगा अशी धमकी दिली. फिर्यादी यांनी सदरचा एमसीईबी स्विच पुन्हा बंद केला असता,त्याने मुलाखत खिडकी क्र.५ मधील इंटरकॉम संच जोरात खाली आपटुन,त्याचे नुकसान केले. तसेच फिर्यादी यांचे अंगावर धावुन जावून,ते करीत असलेले सरकारी कर्तव्य पार पाडण्यास प्रतिबंध केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अमोल वाघमारे ९४२१३१२२१५ |


**जनसंपर्क अधिकारी,**

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**